# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 13/09/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### दुखापत

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत तक्षशिल नगर, इंन्डालको गेट मोबाईल जवळ ता. मौदा येथे दिनांक 09/09/2021 चे 21.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ चंकॅली राकेश मेश्राम वय 22 वर्ष, रा. तक्षशिल नगर, इंन्डालको गेट मोबाईल जवळ ता मौदा व आरोपी नामे– राकेश मेश्राम, वय 22 वर्ष, रा. तक्षशिल नगर, इंन्डालको गेट मोबाईल च्या जवळ, ता. मौदा यांचे 3 वर्षापुवी लग्न झाले असून ते सोबत राहतात. आरोपी हा दारुपिण्याच्या सवईचा असुन शक घेतो व तिला मारझोड करतो. त्यामुळे फिर्यादी दि. 07/09/2021 रोजी आपले वहीणीकडे गेला होती तेव्हा दि. 09/09/2021 रोजी आरोपी फिर्यादी राहत असलेल्या ठिकाणी गेला व फिर्यादीला एकाच ताटात जेवण्यासाठी आग्रह करु लागला. फिर्यादीने एकाच ताटात जेवण्यास नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीला ब्लेडने गालावर व उजव्या हातावर ब्लेडने मारुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राजु आंधळे मो.क्र. 8208874665 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि.मी. सातनवरी येथे दिनांक 12/09/2021 चे 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप मधुकर रागासे वय 60 वर्ष रा सातनवरी ता काटोल, जि. नागपूर हे घराजवळ हजर असता आरोपी क्र. 1. सुभाष माहुरकर हा शिवीगाळ करायला लागला. तेव्हा फिर्यादी याने आरोपीस म्हटले की, ''शिव्या कोणाला देत आहे'' असे म्हटले असता आरोपी क्र. 2 सुनिल माहूरकर, रा. सातनवरी ता. काटोल जि. नागपूर हा तेथे आला व आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून हातबुक्कीने पाठीवर व तोंडावर मारले. तसेच आरोपी क्र 1 याने त्याच्या जवळील काठीने फिर्यादीच्या डाव्या हातावर तसेच डाव्या मांडीवर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 323, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुनिल बन्सोड मो नं. 9764090208 हे करीत आहे.

3) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 7 कि.मी. नक्षी येथे दिनांक 12/09/2021 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. किर्ती रामकृष्ण ठाकरे, वय 35 वर्ष, रा. नक्षी यांच्या घराला लागुन आरोपी क्र 1. रविन्द्र भाउराव करकाडे याचे घर आहे. त्याच्या बाथरूमचे पाणी फिर्यादीच्या घराचे समोरून वाहते. आरोपी क्र 1 याच्या बाथरूमचे सांडपाणी फिर्यादीच्या अंगणतुन वाहत असल्याने फिर्यादीने त्यांना म्हटले की, ''तुमच्या बाथरूममध्ये सांडपाणी माझा अंगाणत वाहत असल्याने गंदगी मुळे मच्छर होते'' या कारणावरून फिर्यादीने हटकले असता आरोपी क्र 1. रविन्द्र भाउराव करकाडे 2. गजानन भाउराव करकाडे 3. सुरेश भाउराव करकाडे व 4. आकाश रविन्द्र करकाडे सर्व रा. नक्षी यांनी संगनमत करून हातबुक्कीने तसेच विटाने मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचा डोळयाजवळ जखम झाली तसेच

फिर्यादीचे पती फिर्यादीला सोडण्याकरीता आले असता त्यांना सुद्धा हातबुक्यानी विटानी मारहान केल्यामुळे डोक्याला व खांदयाला व पाठीवर विटाचा मुका मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 326, 324, 323, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भगवानदास यादव 9422115519 हे करीत आहे.

4) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 07 कि.मी. नक्षी येथे दिनांक 12/09/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविन्द्र भाउराव करकाडे वय 55 वर्ष रा. नक्षी व आरोपी नामे– 1. श्रावण ठाकरे, 2. रामकृष्ण श्रावण ठाकरे, 3. किर्ती रामकृष्ण ठाकरे व 4. माला ठाकरे सर्व रा. नक्षी हे एकाच गावातील रहिवासी असुन एकाच समाजाचे आहेत. फिर्यादीचे बाथरूमचे पाणी आरोपीतांनी अडविले असता पाणी का अडविले असे फिर्यादीने विचारणा केली असता आरोपीतांनी फिर्यादीला शिवीगाळ करून मारण्याची धमकी देवुन अंगावर मिरची पावडर फेकुण लोखंडी सब्बलीने फिर्यादीचे पायावर मारून जखमी केले. तसेच आरोपीचे पत्नीने, आईने, वडीलांने फिर्यादीचे मुलास हातबुक्कीने मारहाण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 324, 323, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार भगवानदास यादव 9422115519 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर